# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२७-२३** **दिनांक :- १७/०४/२०२३**

## राष्ट्रीय महामार्गावर जबरी चोरी करणाऱ्या अरोपीतास अटक
## वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २१/०३/२०२३ रोजी रात्री ०२.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे मोहम्मद रिजवान मोहम्मद फारुख अन्सारी हे त्यांच्या ताब्यातील ओला कारने नालासोपारा फाटा येथुन गोल्डन चॅरिएट हॉटेल जवळ आले असता त्यांना अंदाजे २० ते २५ वर्षे वयोगटाचे दोन इसम भेटले व त्यांनी फाऊंटन येथे सोडण्यास सांगितले असता फिर्यादी त्यांना घेऊन सातीवली ब्रिज जवळील सर्व्हिस रोडवर, सातीवली, वसई पुर्व येथे आले असता त्यांचा मित्र येत असल्याने गाडी बाजुला घेण्यास सांगितले. तदनंतर फिर्यादीच्या गाडीत बसलेल्या एका इसमाने पाठीमागुन फिर्यादीचा गळा पकडला व त्याचे कडील असलेला चाकु फिर्यादीच्या गळयाला लावला व दुसऱ्या इसमाने फिर्यादीचे खिशातील एकुण २०,०००/- रु. रोख रक्कम काढुन घेतली व त्यातील ५००/- रु. फिर्यादीस परत देऊन पाठीमागुन आलेल्या एक लाल व काळया रंगाची डि.ओ. मोटार सायकल क्रमांक एम.एच.०५ बी.व्ही.९०४२ यावर बसुन निघुन गेले. तदनंतर फिर्यादीने त्यांचा पाठलाग केला असता ते गुजरात मुंबई महामार्गावरील वासमाऱ्या ब्रिजजवळ दिसुन आल्याने फिर्यादीने त्याचे ताब्यातील गाडी त्यांचे मोटारसायकल समोर उभी केली असता त्यांनी फिर्यादीचे गाडीला ठोकर मारल्याने त्यांची मोटारसायकल खाली पडली व ते मोटारासायकल सोडुन सदर ठिकाणाहुन पळुन गेले. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणेत गुन्हा. रजि. नं. ३२४/२०२३ भा. दं. वि. सं. कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई-अहमदाबाद हायवेवर जबरी चोरीचे प्रमाणे वाढत असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांनी केलेले मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे वालीव पोलीस ठाणे गुन्हेप्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील बारकावे, तांत्रिक विश्लेषण, सिसिटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदार यांचेकडुन प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत सरोज मारुफ आलम उर्फ सोनु, वय - २६ वर्षे, रा. धानीवबाग, नालासोपारा पुर्व यास अटक करुन तपास केला असता पाहीजे आरोपीत आसीफ उर्फ मव्वा अकील अहमद, रा. धानीवबाग, नालासोपारा पुर्व रप अब्दुल उर्फ कट्टा रा. चौधरी कपांऊड, वाकणपाडा, नालासोपारा पुर्व याचे मदतीने गुन्हे केले असुन पाहीजे आरोपीत यांनी वालीव पोलीस ठाण्याचे रेकॉर्डवरील आणखी १ गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक आरोपीताकडुन वर नमुद गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन त्यांचेकडुन १) वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ३२४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ , २) वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १०५०/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ अन्वये २ गुन्हे उघडकिस आणण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मागदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.ना. बाळु कुटे, पो.अंम.गजानन गरीबे, अभिजीत गढरी यांनी केली आहे.

--




------0000------